**"जानेवारी २०२२" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ३ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये श्री.स.मु.पाताडे, परिविक्षाधीन कक्ष अधिकारी यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ४ जानेवारी २०२२ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एका उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक १० जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यसेवा परीक्षा २०१९ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट-अ व गट-ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ करिता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक ११ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ अंतर्गत राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१९ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या १४ मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण कालावधीकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.
- दिनांक २१ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे सन २०२१-२२ मध्ये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकिय तपासणीबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-७ अंतर्गत राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१९ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या एका मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण कालावधीकरिता अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आले आहे.
- दिनांक २५ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील २७१ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २५ जानेवारी २०२२ च्या पत्रान्वये वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) सादर करण्याची केंद्र शासनाच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ च्या शासन अधिसूचनेची प्रत उचित कार्यवाहीसाठी निर्गमित करण्यात आली आहे.
- दिनांक २७ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्व्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक २७ जानेवारी २०२२ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता वनामतीख नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या बाबीखाली रु.५८.४५ लाख इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## (ख) नियुक्ती / पदोन्नती / प्रपत्र बढती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- २८४ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी पदाच्या पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

## (ग) बदली / प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- एका उच्चश्रेणी लघुलेखकाची बदली करण्यात आली आहे.
- एका लघुटंकलेखकाची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १० जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये श्री.पां.ग.मडके, लिपिक-टंकलेखक यांची ज्येष्ठता सुधारित करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ८४ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२२ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २५ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२२ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २५ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०२२ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ४६ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२२ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जानेवारी २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३३ निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२२ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****